भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.
दिनांक – ०२/०९/२०१९

- प्रेसनोट –

# हौसे खातर पिस्टल बाळगणारे सराईत २ आरोपी अटकेत.

---

दि.०२/०९/२०१९ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विष्णु पवार यांच्या आदेशाने भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस उप निरीक्षक सुबराव लाड व तपास पथकातील कर्मचारी गणपती प्राण प्रतिष्ठा बंदोबस्त असल्याने पेट्रोलिंग करित होतो. पेट्रोलिंग करत असताना पोलीस कर्मचारी कुंदन शिंदे व कृष्णा बढे यांना त्याच्या खास बातमीदारामार्फत मिळाली की, कात्रज गुजरवाडी फाटा येथे एक इसम उभा असुन त्याच्या कमरेला पिस्तुल लावलेला आहे. त्यांने अंगात फिकट निळे रंगाचे फुल भायाचा टि शर्ट घातलेला आहे. मिळालेल्या बातमीवरुन गुजरवाडी फाटा येथे जावुन सोबतच्या स्टाफच्या मदतीने सापळा रचुन इसम नामे मनोहर रघुनाथ मांगडे, वय ४२ वर्षे, रा.सृष्टी हॉटेलच्या शेजारी, मांगडेवाडी, ता.हवेली, जि.पुणे यास ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली त्याच्या कमरेला डावे बाजुस पॅन्टचे आत खोचलेले गावठी देशी बनावटीचे लोखंडी धातुचे पिस्तुल अंदाजे २५,०००/- रु किंमतीचे व उजव्या खिशात एक जिंवत काडतुस १००/- रु किंमतीचे मिळुन आले. त्यास पिस्तुल जवळ बाळगण्याचा परवाना आहे का ? ते कोणाकडुन आणले आहे, याबाबत विचारले असता त्याने त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचा परवाना नसल्याचे सांगुण ते मारुती घोरपडे, रा.जांभुळवाडी, ता. हवेली, जि.पुणे यांच्याकडुन हौसे खातर घेतले असल्याचे सांगितले. त्यांनतर जांभुळवाडी व दत्तनगर भागात मारुती काटयाप्पा घोरपडे, वय ४३ वर्षे, रा. मु पो लासुर्णे, ता इंदापुर, जि पुणे यांचा शोध घेवुन त्यास ही अटक करण्यात आली असुन त्याच्याकडे पिस्टल बाबत अधिक सखोल तपास केला असता त्याने ते सन.२०१५ साली यादव नावाच्या बिहारी इसमाकडुन पिस्टल घेतल्याचे सांगितले आहे. आरोपी मनोहर रघुनाथ मांगडे, याच्या विरुध्द यापुर्वी खुनाचा प्रयत्न, तर मारुती काटयाप्पा घोरपडे याच्यावर कोथरुड पोलीस ठाणे येथे बेकायदेशीर अग्नीशस्त्र बाळगल्याचा व बारामती पोलीस ठाणे येथे जमिनी संदर्भातील फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत.

सदर कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग श्री श्रींकात तरवडे, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री शिरीष सरदेशपांडे सो, सहा. पोलीस आयुक्त श्री मालोजीराव पाटील सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक सुबराव लाड पोलीस कर्मचारी कृष्णा बढे, कुंदन शिदे, सर्फराज देशमुख, सचिन पवार, राहुल तांबे, गणेश चिचंकर, अभिजीत रत्नपारखी, महेश मंडलीक, अभिजीत जाधव, योगेश सुळ यांनी केलेली आहे.

Scanned by CamScanner